दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक १५२ | MAHMAR/2006/17212 | रायगड | मंगळवार, दि.१९ ऑगस्ट २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## इमारतीत घुसून मंगळसूत्र लुटले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलच्या करंजाडे भागातील समर्थ आंगण सोसायटीच्या आवारात घुसून लिफ्टमध्ये जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या विवाहितेवर हल्ला करीत तिच्या गळ्यातील ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरांनी खेचून पलायन केल्याची घटना उघडकीस आली आहे. पनवेल शहर पोलिसांनी या चोरांचा शोध सुरू केला आहे.

पनवेलच्या करंजाडे सेक्टर ४ भागातील समर्थ आंगण सोसायटीत राहणारी अनुराधा धोत्रे (२५) ही विवाहिता बाजारात खरेदीसाठी गेली होती. इमारतीच्या लिफ्टजवळ पोहोचली असताना एका लुटारूने लिफ्टमध्ये जाण्यासाठी उभ्या असलेल्या अनुराधाला मागून जोरात धक्का दिला. यामुळे ती खाली कोसळल्यानंतर लुटारूने तिच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावले.

# रायगड जिल्ह्यात पावसाचा धुमाकूळ

### पनवेल, उरण, अलिबाग, म्हसळा, रोहा, माथेरान, माणगाव, पोलादपूर तालुक्यांना तडाखा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यात पावसाने धुमाकूळ घातला आहे. अलिबाग, पेण, म्हसळा, रोहा, माणगाव, पनवेल, पोलादपूर तालुक्यांना पावसाचा जोरदार तडाखा बसला त्यामुळे जनजिवन विस्कळीत झाले. सखल भागात पूरसदृष्य स्थिती निर्माण झाली आहे, तर हेटवणे धरणातून विसर्ग सुरु असून सहा दरवाजे २०सेंटी मिटर ने उघडले असून धरण पाणी पातळी ८५.१० मीटर आहे.धरणाच्या साडव्या वरून वाहणाऱ्या पाण्याची खोली २०सेंटी मीटर आहे. विसर्ग ११९.५४ घ मी प्रती सेंकद वेगाने विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे भोगेश्वरी नदी किनाऱ्यांवरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

२४ तासात ११२.२३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. रोहा मध्ये सर्वाधीक १६० मिलीमीटर पाऊस नोंदवला गेला आहे. पोलादपूर मध्ये१०६ मिमी, अलिबाग १३५ मिमी, माथेरान १४५ मिमी, पनवेल मध्ये १३४ मिमी, म्हसळा१४३ मिमी, पेण मध्ये १४२ मिमी, महाड मध्ये ९३ मिमी, खालापूर मध्ये ८५ मिमी, सुधागड ८४ मिमी, मुरुड४७ मिमी, माणगाव १४२ मिमी, श्रीवर्धन १४०, तळा





१३४मिमी, पावसाची नोंद झाली.

हवामान विभागाने जिल्ह्याला दोन दिवसांना रेड अलर्ट जारी केला होता. रविवारी सकाळच्या आणि दुपारच्या सत्रात फारसा पाऊस पडला नाही. मात्र संध्याकाळनंतर जिल्ह्यात पावसाचा जोर वाढण्यास सुरूवात झाली.

रात्रभर पावसाच्या जोरदार सरी कोसळत होत्या, सोमवारी सकाळीही पावसाची संततधार कायम होती. त्यामुळे ठिकठिकाणी सखल भागात पाणी साचणे, वृक्ष उन्मळून पडणे, वीज पूरवठा खंडीत होणे यासारख्या घटना घडल्या. अतिवृष्टीमुळे अलिबाग शहरातीच्या सखल भागात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. ग्रामीण परिसर जलमय झाला होता. बोरघर येथील पूरपरिस्थिती ची पाहणी अलिबाग तहसीलदार विक्रम पाटील यांनी स्वतः जाऊन केली.

पावसाचा जोर वाढल्याने कुंडलिका, सावित्री, पाताळगंगा, अंबा नद्यांच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे. अंबा, कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली आहे.

पावसाचा जोर कायम राहिला तर सावित्री पातळगंगा नद्यांही इशारा पातळी ओलांडण्याची शक्यता आहे. आपत्कालीन परिस्थितीत ०२१४१-२२२११८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहकन आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण विभागाने केले आहे.



## पैसे तर सगळेच कमावतात मात्र ते देण्याची दानत ही फक्त रामशेठ ठाकूर यांच्यामध्येच : उपमुख्यमंत्री अजित पवार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे दानशूर कर्णाचा अवतार आहे. त्यांचा सारखा दिलदार पण हा मी कोणामध्येच पाहिला नाही. पैसे तर सगळेच कमावतात मात्र ते देण्याची दानत हि फक्त रामशेठ ठाकूर यांच्या मध्येच आहे. त्यामुळे मी महाराष्ट्राच्या तमाम १३ कोटी जनतेच्यावतीने त्यांचे अभिनंदन करतो असे गौरवोद्गार राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ईश्वरपूर येथे केले.

सांगलीतील ईश्वरपूर येथे महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित प्राध्यापक डॉक्टर एन.डी. पाटील विधी महाविद्यालय, श्रीमती सरोज पाटील मानसशास्त्र संशोधन केंद्र आणि डॉक्टर एन.डी. पाटील बहुउद्देशीय सभागृहाचे उद्घाटन शनिवारी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

यावेळी झालेल्या कार्यक्रमात डॉक्टर एन. डी. पाटील बहुउद्देशीय सभागृहासाठी जिल्हा योजना अनुदानातून दहा कोटी रुपये देण्याचे आश्वासन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. तसेच माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी एक कोटी रुपयांची तर आमदार रोहित पवार यांनी ४० लाख रुपयांची देणगी जाहीर केली. यावेळी संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील यांनी बहुउद्देशीय सभागृह वास्तूसाठी आर्थिक सहाय्य करण्याचे आवाहन केले आहे. हे तीनही उपक्रम केवळ संस्थात्मक विकासाची नवी पायरी नसून, शिक्षण, सामाजिक जागृती, न्याय, कला-संस्कृती आणि मानसिक आरोग्य क्षेत्रात समाजाला बहुआयामी फायदे देणारी ऐतिहासिक पाऊल ठरणार आहेत.

यावेळी भाषण करताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की पैसे तर सगळे कमावतात मात्र ते देण्याची दानत हि फक्त रामशेठ ठाकूर यांच्या मध्येच आहे असे त्यामुळे मी महाराष्ट्राच्या तमाम जनतेच्यावतीने त्यांचे आभार मानतो असे म्हणाले. तर संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील यांनीही रामशेठ ठाकूर म्हणजे हिरा आहेत. गव्हाण गावातील एका अत्यंत गरीब कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांचा कमवा आणि शिका हा मंत्र घेऊन शिक्षण पूर्ण केले तसचे पुढे ते मोठे उद्योजक झाले. त्यांचे व्यक्तिमत्व हे अत्यंत प्रामाणिक, प्रेमळ आणि दयाळू असून त्यांनी १०० कोटीहून अधिक रूपये संस्थेला संस्थेला दिले आहे.

या कार्यक्रमाला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार धैर्यशील माने, आमदार जयंतराव पाटील, रोहित पवार, बार कौन्सिल ऑफ इंडियाचे सदस्य, आशिष देशमुख, कोल्हापूर शिव-ाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉक्टर डी. टी. शिर्के, शिक्षण संचालक डॉक्टर शैलेंद्र देवळाणकर, सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, शिक्षण विभागाचे विभागीय सहसंचालक डॉक्टर प्रकाश बच्छाव, महेश चोथे यांच्यासह विविध स्थैर्यातीलक्षेत्रातील पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थिती होते.

## माणगांवातील राष्ट्रवादीचे नेते प्रभाकर उभारे यांचे निधन

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव नगरीचे माजी सरपंच, पंचायत समितीचे माजी सभापती तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस मा. प्रभाकर उभारे (प्रभाकर दादा) यांचे रविवार दि.१७ ऑगस्ट रोजी पहाटे पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात वयाच्या ७१ व्या वर्षी दुःखद निधन झाले. ते माणगांवच्या विकासाच्या वाटेवरील तीन आदर्शवत दादा व्यक्तिमत्वांपैकी शेवटचे होते. त्यांच्या निधनाने माणगांवकरांनी एक अष्टपैलू, सर्वमान्य नेते गमावले आहेत.



माणगांव तालुक्यातील दाखणे गावचे सुपुत्र प्रभाकर दादांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात मोठा ठसा उमटवला. सलग दहा वर्षे सरपंच, पंचायत समितीचे सभापती, तसेच महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेचे सदस्य म्हणून त्यांची कारकीर्द उल्लेखनीय ठरली. खेळाडूंना घडवण्याची त्यांची ओढ प्रखर होती. माणगांव तालुका क्रीडा महोत्सव, राज्यस्तरीय बॉल बॅडमिंटन स्पर्धा, जिल्हास्तरीय मॅरेथॉन, कबड्डी व सायकल स्पर्धा तसेच शालेय खेळाडूंसाठी विशेष शिबिरांचे आयोजन त्यांच्या प्रयत्नातून झाले. खर्डी येथील तालुका क्रीडा संकुल हे त्यांचेच स्वप्न होते.

ग्रामपंचायत कारकिर्दीत स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांशी त्यांनी जवळीक ठेवून त्यांना सदैव आधार दिला. शैक्षणिक संस्थांतील शिक्षक व कर्मचारी यांच्याशीही त्यांचे स्नेहाचे संबंध होते. जनतेची कामे कधी अडवून ठेवली नाहीत, कोणतेही राजकारण न करता ते नेहमी कार्यतत्पर राहिले.

रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी लंडनहून व्यक्त केलेल्या श्रद्धांजलीत म्हटले आहे, प्रभाकर दादा माझे अत्यंत जवळचे, विश्वासू व अष्टपैलू सहकारी होते. त्यांचे जाणे वेदनादायक आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

माणगांवच्या विकासात्मक जडणघडणीचा पाया मजबूत करणारे, शहराचा सर्वंकष विकास हे स्वप्न उराशी बाळगून जीवन व्यतीत करणारे माणगांवकरांचे आदर्शवत दादा पर्व हरपले ! माणगांवच्या झपाट्याने वाढीसाठी योगदान देणाऱ्या तीन दादांमध्ये - लोकनेते अशोक दादा साबळे, सहकार क्षेत्रातील दादा भोनकर आणि क्रीडाप्रेमी प्रभाकर दादा - यांची नावे घेतली जातात. या त्रयीतील शेवटचे व्यक्तिमत्व हरपल्याने माणगांवकर हळहळ व्यक्त करीत त्यांच्या स्मृतींना उजाळा देत भावपूर्ण श्रद्धांजली वाहत आहेत.

## १२ चाकी कंटेनर कलंडल्याने मुंबई गोवा महामार्गावरील वाहतूक ठप्प

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

सोमवारी दुपारी पावण-चार वाजण्याच्या सुमारास मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पोलादपूर शहरालगत असलेल्या चोळई गावाजवळ चिपळूण बाजूकडून मुंबई दिशेने जाणारा कंटेनरवाहू १२ चाकी ट्रक रोडडिव्हायडरवर कलंडल्याने झालेल्या अपघातात भरपावसात वाहतुकीचा खोळंबा होऊन कशेडी घाटातील वाहतूक काही काळ ठप्प झाली.

कशेडी घाटातील चोळई गावाच्या तीव्र वळण उतारावरून अतिवेगाने १२ चाकी कंटेनरवाहू ट्रक चालवत उतरताना चालक सद्दाम महंमद माकोडा (रा. गुजरात) याचा ट्रक (क्रमांक जीजे१० टीव्ही ६५५०) वरील ताबा सुटल्याने महामार्गावरील रोडडिव्हायडरवरील लोखंडी बॅरिकेटस तोडून पलटी झाला. या अपघातात चालक किरकोळ जखमी झाला. या अपघातामुळे महामार्गावरील दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प झाली असून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून कंटेनरमधील सामान आणि कंटेनरचे अवशेष बाजूला केल्यानंतर दोन्ही बाजूने एकेरी वाहतूक सुरू करण्यात वाहतूक पोलीसांना यश आले आहे.

पावसाची संततधार सुरू असताना चालकाच्या हलगर्जीपणामुळे झालेल्या या घटनेमुळे घाटामध्ये रखडलेल्या प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सोस-ावा लागला. या अपघाताची माहिति समजताच सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे, पोलीस हवलदार रुपेश पवार व कोंढाळकर, अनुजित शिंदे, धायगुडे, कांजर, खराडे, सतीश कदम, शिंदे यांच्यासह कशेडी महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक काही काळानंतर सुरळीत सुरू केली आहे.



## यंदाच्या महानगरपालिकेसह इतर सर्व निवडणुकीत शिवसेना आपले वर्चस्व राखणार : अनंत गीते

**दै.रायगड नगरी । पनवेल**

यंदाच्या महानगरपालिकेसह इतर सर्व निवडणुकीत शिवसेना आपले वर्चस्व राखणार असे प्रतिपादन शिवसेना नेते तथा मा.केंद्रीय मंत्री अनंत गीते यांनी शिवसेना सुकापुर शाखेचे उद्घाटन प्रसंगी केली . हे उद्घाटन शिवसेना नेते तथा मा.केंद्रीय मंत्री अनंत गीते यांच्या शुभ हस्ते व शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाले.

शिवसेना ही ८०% समाजकारण व २०% राजकारण करणारी संघटना आहे. याचे उदाहरण म्हणजे आज झालेल्या शाखेच्या उद्घाटन प्रसंगी १० वी व १२ वी उतीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला असे शिवसेना नेते अनंत गीते यांनी म्हटले. सुकापुर शाखा प्रमुख हनुमंत खंडागळे, उपशाखा प्रमुख सचिन खरात, डॉ. सेल चे उपाध्यक्ष डॉ. आशीष बांदेकर यांचे विशेष आभार मानण्यात आले. यावेळी उपनेते बबनदादा पाटील, संपर्क प्रमुख प्रसाद भोईर, शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत, विधानसभा संघटक दिपक निकम, तालुका प्रमुख संदीप तांडेल, तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बडे, शहर प्रमुख यतीन देशमुख, शहर प्रमुख सदानंद शिर्के, शहर प्रमुख रामदास गोवारी, रामदास पाटील, युवासेना जिल्हाअधिकारी पराग मोहिते, विधानसभा अधिकारी अजय पाटील, युवासेना तालुका अधिकारी मनोज कुंभारकर, विभाग प्रमुख विशाल भोईर, शेकापचे राजेश केणी, उपविभाग प्रमुख जयंत पाखरे, ऋषभ मोहिते, महिला आघाडीच्या उपजिल्हा संघटिका सौ. रेवती सकपाळ, तालुका संघटिका सौ. अनीता डांगरकर, उपतालुका संघटिका सौ. तनुजा झुरे, शिवसेना महानगर संघटिका लिना गरड, सौ. मालती पिंगळा, सौ. वैशाली थळी, सौ. निशा कदम, सौ. नम्रता शिंदे, यांच्या सह शिवसेना पदाधिकारी, शाखा प्रमुख, उपशाखा प्रमुख, महिला आघाडी पदाधिकारी, युवासेना पदाधिकारी व सुकापुरचे शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मोदींचे ‘संघम् स्मरणम’

स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीयांना संबोधित करताना देशवासीयांबरोबरच साऱ्या जगालाही अनेक संदेश दिले आहेत. एखाद्या मॉलमध्ये कुटुंबातील प्रत्येकासाठी हवी ती वस्तू उपलब्ध असते, त्याप्रमाणे त्यांच्या भाषणामध्ये ‘ ऑपरेशन सिंदूर’ पासून ते ‘विकसित भारता’पर्यंत आणि वस्तू व सेवा करदात्यांपासून ते बेरोजगार-नवनोकरदारांपर्यंत अशा सर्वांसाठी काही ना काही उल्लेख असल्याने ‘जो जे वांछिल...’ या उक्तीप्रमाणे प्रत्येक जण हवा तो अर्थ काढण्यास मोकळा आहे. यातील सर्वाधिक लक्षवेधी ठरला, तो त्यांनी आवर्जून केलेला संघगौरव. त्यांनी केलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या थेट आणि सविस्तर उल्लेखाने अनेकांच्या भुवया उंचावल्या. लहानपणापासून संघाचे स्वयंसेवक असलेले मोदी यांनी मातृसंस्थेच्या सेवाकार्याचा आणि एकंदर योगदानाचा आदराने गौरव करणे स्वाभाविकच आहे; तसेच यंदा त्यास संघाच्या शताब्दीचे औचित्यही लाभले आहे. तरी सुद्धा शब्द न् शब्द अवधान राखूनच उच्चारणाऱ्या आणि विनाकारण कोणताही उल्लेख न करण्याची ख्याती असलेल्या या नेत्याच्या भाषणातील प्रत्येक विधानास निरनिराळ्या अर्थांचे पंख न फुटते, तरच नवल.शताब्दी गाठणाऱ्या जगातील सर्वांत मोठ्या संघटनेच्या भारताच्या पंतप्रधानांनी केलेल्या गौरवाने संघविचारांवर भरणपोषण झालेले नक्कीच सुखावले, तर विरोधकांनी यावर अपेक्षेप्रमाणे टीकास्त्र सोडले आहे. मात्र, गेल्या काही दिवसांमध्ये संघ आणि मोदी सरकार यांच्यातील नाते ताणले गेल्याच्या खऱ्या-खोट्या चर्चेचीही पार्श्वभूमीही लक्षात घेतली पाहिजे. भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी लोकसभा निवडणुकीच्या काळात, भाजपला संघाची गरज नाही, अशा आशयाचे विधान केले होते. त्यातून संघ परिवारात मोठे वादळ उभे राहिले आणि ऐन निवडणुकीत संघाने हात राखूनच काम केल्याचीही चर्चा रंगली होती. आता आगामी बिहार निवडणुकीच्या तोंडावर मोदी यांनी विचारांच्या गंगोत्रीला केलेल्या नमनातून सहकार्याचे आवाहनही दृग्गोचर होते. त्याबरोबरच गेल्या काही काळात संघाच्या धुरिणांनी विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने केलेल्या वक्तव्यांचा संदर्भ लावला, तर त्या दृष्टीनेही मोदी यांच्या भाषणातून अनेक अर्थ निघतात. सरसंघचालक मोहन भागवत यांनी दिवंगत नेते मोरोपंत पिंगळे यांचा उल्लेख करून ७५ वर्षांनंतर निवृत्तीबाबतचा बाण मोदी यांच्याच दिशेने सोडल्याचे अनेक जण सांगू लागले होते. नंतर संघाने सारवासारव केली असली, तरी त्या विषयाचे कवित्व अजूनही संपलेले नाही. त्या पार्श्वभूमीवर ‘भारत ही जगातील तिसरी अर्थव्यवस्था होण्याकडे वाटचाल करीत असून मीच लाल किल्यावरून ही सुवार्ता सांगणार,’ या ‘निर्धारा’तून मोदी यांनी त्यांच्या कथित निवृत्तीचा मुद्दा किमान त्यांच्या दृष्टीने सध्या तरी मोडीत काढला, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. त्यामुळेच त्यांच्या निवृत्तीसाठी देव पाण्यात बुडवून बसलेले विरोधी पक्षांचे नेते आणि स्वपक्षातील स्वयंघोषित वारसदारांनाही काही काळ वाट पहावी लागणार, असे दिसते. याच भाषणात मोदी यांनी देशातील करसुधारणांबाबत स्पष्ट केलेली दिशा स्वागतार्ह आहे. वस्तू व सेवा करातील (जीएसटी) गुंतागुंत कमी करून सुटसुटीत रचना हवी, अशी मागणी अनेक घटकांमधून करण्यात येत होती. त्या पार्श्वभूमीवर, जीएसटीचे चार टप्पे कमी करून पाच टक्के आणि अठरा टक्के, अशी रचना आणि त्यामध्ये दैनंदिन वापराच्या वस्तूंचा पाच टक्क्यांच्या आकारणीत समावेशाचे आश्वासन महागाईच्या दिवसांत सर्वसामान्यांसाठी दिलासादायक आहे. विमा वगळता अन्य सेवांवर १८ टक्के कराचाही प्रस्ताव आहे, त्यातून भविष्यात जीवनविमा आणि आरोग्यविम्याच्या हप्त्यांचा बोजा कमी होऊ शकतो. ‘पंतप्रधान विकसित भारत रोजगार योजने’तून साडेतीन कोटी रोजगारांची निर्मिती आणि खासगी नवनोकरदारांना १५ हजार रुपये, हे निवडणुकीत कळीचा प्रश्न ठरू पाहणाऱ्या बिहारमधील तरुण मतदारांसाठी भाजपच्या जाहीरनाम्यातील कलमच ठरावे. ‘ऑपरेशन सिंदूर’ आणि सिंधू पाणीकरार रद्द करण्याचा मुद्दा मांडून पंतप्रधानांनी पाकिस्तानला कडक शब्दांत इशारा दिला; तसेच ‘आत्मनिर्भर भारत’ योजनेवर भर देऊन अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या आयातशुल्काच्या धमक्यांना प्रत्युत्तरही दिले आहे. अशा अनेकविध मुद्द्यांना स्पर्श केल्याने पंतप्रधानांच्या तब्बल १०३ मिनिटांच्या विक्रमी भाषणात ‘जन की बात’ ही दिसून आली, असे म्हणता येईल.

# श्रीवर्धन परिवहन आगाराने सोडली गळकी बसगाडी ; प्रवाशांना मनस्ताप

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

शनिवारी गोकुळाष्टमी हा उत्सव असल्याने श्रीवर्धन तालुक्यातील मुंबईत राहणारे असंख्य नागरिक सण साजरा करण्यासाठी गावाकडे आले होते. त्यामुळे रविवारी मुंबईकडे परतीच्या प्रवासासाठी असलेल्या सर्व गाड्या पूर्णपणे भरून जात होत्या. मात्र त्यानंतर देखील श्रीवर्धन बस स्थानकामध्ये मुंबईला जाणारे अनेक प्रवासी असल्याचे लक्षात आल्यानंतर, श्रीवर्धन आगाराने साडेचार वाजता श्रीवर्धन मुंबई ही जादा बस गाडी सोडली. सदरची बस श्रीवर्धन परिवहन स्थानकामधून सुटली. त्यावेळी पाऊस अत्यंत रिमझिम पडत होता.

परंतु बस जसवली फाट्याच्या पुढे गेल्यानंतर पाऊस जोराने सुरू झाला व संपूर्ण बस मध्ये भरपूर पाणी गळू लागले. त्यामुळे प्रवाशांनी वाहकाकडे तक्रार केल्यानंतर बोडणी घाटातून बस परत फिरवण्यात आली. व श्रीवर्धन बस स्थानकात आणण्यात आली. श्रीवर्धन स्थानकामध्ये त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या वाहतूक नियंत्रकांबरोबर प्रवाशांनी हुज्जत घातल्यानंतर पर्यायी बस देण्यात आली. परंतु सदरची बस देखील पूर्णपणे गळकी होती. आसनांची मोडतोड झालेली होती, आणि सायंकाळी ४:३० वाजता सुटणारी बस ही मुंबईला पोचेपर्यंत रात्र होणार होती.

अशा परिस्थितीत गळकी बस प्रवाशांना देऊन प्रवाशांच्या मनस्तापाचे कारण ठरले. सध्या श्रीवर्धन आगारांमधून लांब पडल्याच्या अनेक फेऱ्या सुरू आहेत. परंतु श्रीवर्धन आगारात नवीन बसेस उपलब्ध होत नसल्यामुळे अक्षरशः भंगार झालेल्या बसेस लांब पल्ल्याच्या मार्गावरती सोडण्यात येतात. अनेक वेळा बसच्या चाकाचे नटबोल्ट निखळून पडतात. चाक निखळतात, तर अनेक वेळेला मार्गावरती बस ब्रेकडाऊन होण्याचे प्रकार देखील घडत असतात. सदर गोष्टी नंतर श्रीवर्धनचे आगार व्यवस्थापक मेहबूब मनेर यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा फोन स्विच ऑफ होता.

तरी रायगडच्या विभाग नियंत्रकांनी श्रीवर्धन आगारामध्ये तातडीने चांगल्या बसेस उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी प्रवासी वर्गामधून केली जात आहे.या बाबत परिवहन मंत्री यांनी लक्ष देण्याची मागणी होत आहे.



# आई जनाई, सोमजाई, कालकाई माता व शिवपिंडीला श्रावणाच्या शेवटच्या सोमवारी अभिषेक सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर तालुक्यातील डोंगराळ भागात वसलेल्या मोरगिरी गावातील पुरातन आणि श्रद्धास्थानी असलेल्या आई जनाई, सोमजाई, कालकाई देवी व शिवपिंडीच्या मंदिरात श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी अभिषेक सोहळा मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला.

या मंदिराला ब्रिटिश काळात, १८५६साली राणी विक्टोरिया यांच्या काळात सनद प्राप्त झाली असल्याची माहिती मंदिराच्या विश्वस्तांकडून देण्यात आली सदर १९५८साली विश्वस्त मंडळ रजिस्ट्रेशन करण्यात आले त्याचा नंबर ४२३(-) कुलाबा गणपत तुकाराम सोंडकर उर्फ शिंदे २) गोविंद विठू सोंडकर उर्फ शिंदे ३) महादेव बाळु सोंडकर उर्फ शिंदे असे होते. आणि आत्ता सुरेश गणपत सोंडकर उर्फ शिंदे, प्रकाश गोविंद सोंडकर उर्फ शिंदे, संदीप महादेव सोंडकर उर्फ शिंदे असे आहेत. ऐतिहासिक व धार्मिक पार्श्वभूमी लक्षात घेता, त्याचा जिर्णोद्धार करण्याचा संकल्प विश्वस्तांकडून करण्यात आला आहे.

सोहळ्याच्या दिवशी पूरोहितांच्या उपस्थितीत पाच श्रद्धावान जोडप्यांच्या हस्ते अभिषेक सोहळा पार पडला. यामध्ये प्रमुख विश्वस्त प्रकाश गोविंद शिंदे व त्यांच्या उभयता, नरेश वाडकर व उभयता, विलास बर्गे व उभयता, चंद्रकांत ढेबे व उभयता, तसेच शिवभक्त समाजसेवक व दानशूर व्यक्तिमत्व सतीशदादा शिंदे व त्यांच्या उभयता यांनी सहभाग घेतला.

या दिवशी परिसरातील तसेच पोलादपूर तालुक्यासह पुणे, मुंबई, बडोदा येथून आलेल्या अनेक सासरवासिनी, गावकरी व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाविकांसाठी ग्रामस्थ आणि विश्वस्त मंडळाच्या वतीने अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल विश्वस्त मंडळ आणि ग्रामस्थांच्या वतीने सर्व भाविकांचे व स्वयंसेवकांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. अबालवृद्ध भाविक भक्तांनी उपस्थित होते विश्वस्तानी. प्रचंड मेहनत घेतली, त्यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिभावाने भारले गेले होते.



# १६ वर्षीय मुलीला अज्ञात आरोपीने फूस लावून नेले पळवून

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका १६ वर्षीय मुलीला अज्ञात आरोपीने फूस लावून पळवून नेल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.

आरना पारधी ( वय १६ वर्ष ८ महिने ) उंची ५ फूट, रंग गोरा, चेहरा गोल, बांधा मजबूत, केस काळे, नाक सरळ असून अंगात निळ्या रंगाचा टॉप व करड्या रंगाची लेगीस पॅन्ट घातलेली आहे. सोबत मोबाईल फोन आहे.

या मुली बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# माथेरानमध्ये रानभाजी महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । माथेरान**

थंड हवेचे आणि निसर्ग संपदांनी नटलेले माथेरान हे नेहमीच पर्यटकांचे आकर्षण राहिले आहे. विशेषतः श्रावण महिन्यात या डोंगरकपारींमध्ये औषधी गुणांनी युक्त रानभाज्या मोठ्या प्रमाणावर उगवतात. आदिवासी समाज या भाज्या गोळा करून विक्री करतो व त्यावर उदरनिर्वाह चालवतो. नागरिकांकडून यांना श्रावणात प्रचंड मागणी असते. या पार्श्वभूमीवर माथेरान कोकणवासीय समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत सुतार यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेला ‘रानभाजी महोत्सव’ माथेरान कम्युनिटी सेंटर येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन समाजातील ज्येष्ठ सदस्य भालचंद्र सावंत, कांचन केतकर, महिला अध्यक्षा सारिका पाटील, रिया दळवी व परेंदु मोरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. या महोत्सवात रानभाज्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. भाज्यांचे औषधी गुणधर्म, आरोग्यदायी फायदे याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

तसेच या भाज्यांपासून तयार केलेले स्वादिष्ट पदार्थ नागरिकांना चाखण्यासाठी ठेवण्यात आले होते. याशिवाय बांबूपासून बनविलेल्या वस्तू, शिंपल्यांपासून तयार दागिने आणि रानभाज्यांवरील माहितीपूर्ण पुस्तके यांच्या छोट्या स्टॉल्सनी महोत्सवाला आणखी रंगत आणली.

या उपक्रमाला शाळकरी विद्यार्थी, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. पावसाची जोरदार बॅटिंग सुरू असतानाही नागरिकांनी उपस्थित राहून महोत्सवाला प्रचंड प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समाजाच्या कार्यकारिणी सदस्यांसह महिला, पुरुष आणि तरुणांनी उत्साहाने योगदान दिले. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा प्रकारचे कार्यक्रम वारंवार आयोजित व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. रानभाज्यांची माहिती आणि चव पुढील पिढीपर्यंत पोहोचावी हा महोत्सवाचा उद्देश निश्चित साध्य झाला आहे, असे मत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

पावसाच्या तुफानी सरींमध्येही नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद म्हणजे या महोत्सवाच्या यशाची खरी पावती आहे. माथेरानमध्ये घेतलेला हा आगळावेगळा उपक्रम आगामी काळातही परंपरा म्हणून जपला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



# श्री भैरवनाथ देवस्थान गोरेगांवचा अखंड सप्ताहाची भक्तीभावाने यशस्वी सांगता

**दै.रायगड नगरी । तळा**

श्री भैरवनाथ महाराज गोरेगांव हे समस्त गोरेगांवकरांचे ग्रामदैवत श्रध्दा स्थान आहे. अठरा पगड जातीचे वतनदार असून चैत्र शुद्ध त्रयोदशीला जत्रेची लाट आणून चतुर्दशीला माणगांव तालुक्यातील सर्वात प्रसिध्द मोठी यात्रा भरते. श्री भैरवनाथाचा श्रावण वद्य प्रतिपदा ते सप्तमी असा सात दिवस अखंड भजन सेवा केली जात असे परंतु कालपरत्वे बदल होत गेला असला तरी अखंड टाळ सप्ताह साजरा केला जात आहे. त्या अगोदर प्रदोष तिथीला भैरवनाथ महाराज यांना वस्त्रालंकार, आभुषणे चढवली जातात. दैवज्ञ सोनार समाजाचे पोवळे कुटुंबांचे कुलदैवत असून पोवळे मुख्यवतनदार आहेत हे सालकरी वतनदार असून गेली जवळपास तीनशे वर्षांपूर्वी पासुन ची परंपरा आज देखील जपली आहे.

यावेळी अनिल (बंड्या) पांडुरंग पोवळे सालकरी व्यवस्थापक असून विविध पंचोपचारी पुजा सेवा करून प्रदोष तिथी समयी वस्त्रदेवाला चढवून दररोज पुजा सेवा,नैवेद्य अर्पण केला जातो.व श्रावण वद्य प्रतिपदे पासून अखंड भजन टाळ सप्ताह सुरुवात केली जाते मुख्य वतनदार पोवळे कुटुंब भैरवनाथाला गाऱ्हाणे घातले जाते.श्री भैरवनाथ महाराजा प्रतिवर्षी प्रमाणे सप्ताह सुरू करीत असुन पोवळे कुटुंबासह सर्व भावकी गावकी तुझ्या हद्दीतील ग्रामस्थ भक्तगणांना सुखी ठेव, संकटातून दूर कर.इडा पिडा दूर कर. निर्विघ्नपणे सप्ताह पार पडू दे असे आवाहन करून सप्ताह सुरू केला जातो. दररोज सकाळ पासून रात्री पर्यंत दिवस रात्र जागर केला जातो. याची सेवा करण्याची प्रत्येक घरातील कुंटूबांना जबाबदारी वाटून दिली आहे. गोकुळाष्टमी, गोपाळकाला दहिहंडी (गोविंदा) सण साजरा झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी पुजा सेवा महा आरती, महाप्रसादाने सप्ताह सांगता करण्यात आली. तसेच श्रावण महिन्यात नवं वधूची मंगळागौर महिला मंडळाच्या वतीने साजरी करण्याची परंपरा जपली आहे त्यामुळे महिला संघटन एकात्मता दिसून येत असून धार्मिक रुढी परंपरा जपली आहे. हा सप्ताह संपुर्ण सोनार समाज भक्ती भावाने श्रध्देने साजरा करीत आहेत.


## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२

ई-मेल: panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र.- पमपा/मातंवि/२१२५/प्र.क्र.०५/२०२५

### अंदाजपत्रक बनविणेकामी

| अनु. क्र. | प्रकरण क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | पमपा/मातंवि/२१२५/ प्र.क्र.०५ / २०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील भूखंडचे सर्वेक्षण करणेकामी DGPS (DIFFERENTIAL GLOBAL POSITIONING SYSTEM) उपकरण व उपकरणीय प्रणाली खरेदी करणेबाबत. |

या बाजारभावाबाबतची माहिती वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि. १९/०८/२०२५ ते दि. २५/०८/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**उप आयुक्त (मातंवि)**
**पनवेल महानगरपालिका**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे : भालगांव, ता.रोहा, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत आहे. सदरहू मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालक नथुराम चंदर चव्हाण व इतर ३ यांचे मालकीची सदर मिळकत कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**- मिळकतीचे वर्णन-**

**मौजे : भालगांव, ता.रोहा, जि.रायगड येथिल खालील वर्णनाची मिळकत**

| गट नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|
| १७५ | ०-२४-५० पो.ख. ०-०१-८० एकूण ०-२६-३० | ६.०० |

तरी सदर मिळकती संबंधी कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण दान, बक्षीस, खरेदीखत, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मुत्युपत्र बोजा अथवा अन्य कोणत्याहि प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबध असल्यास त्यांच्या लेखी हरकती अशा हरकती मध्ये नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ दिवसांचे मुदतीत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात या प्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/०८/२०२५

**सही/-**
**प्रसाद वामन कोंडे देशमुख**
**ॲडव्होकेट, पनवेल**
**ए/४, जय नगर सोसायटी, किनारा सोसायटी,**
**५२ बंगला, कोर्ट रोड, पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८२०३३४९३३**



## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-चेरवली, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन-**

**मौजे : चेरवली, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटादारांचे नाव | गट क्र.व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|---|
| चेरवली | श्री.सुरेश जोमा भालेकर व इतर १ | ३०/० | क्षेत्र- ०-४३-३० पो.ख-०-०८-१० एकूण ०-६०-४० पैकी भोगवटादार यांचे हिश्श्याचे ०.२०.४० हे.आर.पॉ. | ८.९४ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/०८/२०२५

**सही/-**
**ॲड.रेश्मा अ. कांबळे**
**१३०२, १३ वा माळा, मॅनहटन बिल्डींग, साई वर्ल्ड सिटी, पळस्पा फाटा, ता. पनवेल, जि. रायगड**
**मो.नं.८२३७०७११३०**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# रेशनिंग दुकानदारांचे मोफत धान्य वाटपाचे थकीत कमिशन बाबत मुखमंत्र्यांना साकडे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील १३७ रास्त भाव धान्य दुकानदारांचे कमिशन मार्जिनचे प्रलंबित प्रकरणाबाबत पनवेल रास्त भाव संघटनेचे अध्यक्ष भरत पाटील यांनी या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या गंभीर प्रकारांमध्ये समरण पत्राद्वारे लवकरात लवकर कारवाईची मागणी केली आहे

त्यांनी दिलेल्या पत्रात नमूद केले आहे कि जिल्हापुरवठा अधिकारी रायगड अलिबाग यांनी दि०८/०७/२०२५ रोजी पाठविलेल्या पत्रानुसार विषयांकित प्रलंवित मार्जीन SNA SPARSH अंतर्गत रजिस्ट्रेशन झालेल्या ६२ रास्त भाव धान्य दुकानदारांना मार्जिन रक्कम अदा करण्यांत आलेली आहे परंतु आमच्या संघटनेच्या उपलब्ध माहिती नुसार पनवेल तालुक्यातील १९९ रास्त भाव धान्य दुकानदारांनी तालुका पतळीवर संपूर्ण कागदपत्रे सादर करून सुध्दा १३७ दुकानदारांचे SNA SPARSH अंतर्गत रजिस्ट्रेशन संबंधित अधिका–यांनी केलेले नाही त्यामुळे तालुक्यातील १९९ पैकी १३७ रास्त भाव धान्य दुकानदारांचे कमिशन मार्जिनचे प्रकरण प्रलंबित असून हि बाब गंभीर स्वरूपाची आहे.

युध्दपातळीवर एक विशेष बाब म्हणून १३७ रास्त भाव धान्य दुकानदारांचे कमिशन मार्जिनचे प्रलंबित प्रकरण त्वरीत हातावेगळे करण्यांचे आदेश संबंधित जिल्हा व तालुका अधिका–यांना आपण निर्गमित करावे अशी मागणी या समरण पत्राद्वारे करण्यात आली आहे

# साळाव–तळेखार महामार्गाच्या दुर्दशेविरोधात नागरिकांचा जनआक्रोश उसळला!

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

साळाव–तळेखार महामार्गाची दुर्दशा! सहा महिन्यांपासून उखडून ठेवलेल्या १३ किमी रस्त्यामुळे नागरिकांचा संताप उसळला. चडखऊ आणि कंत्राटदाराच्या ढिसाळ व बेजबाबदार कारभाराला नागरिकांचा जाहीर चपराक देत आज अलिबाग येथे प्रचंड पावसात उग्र रास्तारोको पेटला.



शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली, उपजिल्हाप्रमुख प्रशांत मिसाळ, मा. जिल्हापरिषद सदस्य राजेश्री मिसाळ, मुरूड तालुकाप्रमुख नवशाद दळवी, युवासेना तालुकाप्रमुख किशोर काजारे, चणेरा विभाग प्रमुख मनोज तांडेल, चोरडे सरपंच तृप्ती घाग, साळाव सरपंच वैभव कांबळे, मिठेखार सरपंच अश–ोक वाघमारे, नागाव मा.सरपंच नंदकुमार मयेकर, विशाल तांबडे, रमेश गायकर, सनी ठाकूर शिवसैनिक व स्थानिक ग्रामस्थ यांच्या सहकार्याने तब्बल २०० ते २५० नागरिकांनी भर रस्त्यात बसून तीव्र आंदोलन छेडले.

खड्डे, चिखल, अपघात व प्रवाशांचे हाल यामुळे संतप्त नागरिकांचा आक्रोश अक्षरशः ओसंडून वाहत होता. प्रचंड पावसाची पर्वा न करता घोषणाबाजी, आक्रमक जाहीर इशारे आणि उग्र घोषणांनी परिसर दणाणून गेला. ढिसाळ कारभार करणाऱ्या MSIDC आणि कंत्राटदाराला यापुढे नागरिक माफ करणार नाहीत; मागण्या मान्य न झाल्यास याहूनही भव्य आणि आक्रमक मोर्चा उभारला जाईल! अशी जिल्हाप्रमुख सुरेंद्रदादा म्हात्रे यांची गर्जना झाली.

आंदोलनादरम्यान नागरिकांचे निवेदन चडखऊ चे मुख्य अधिकारी एम.के. सिंग यांना देण्यात आले. नागरिकांनी गणे–शोत्सवाआधी सर्व खड्डे भरून रस्ता वाहतुकीसाठी खुला करावा, डिसेंबर २०२५ पूर्वी संपूर्ण महामार्गाचे कॉंक्रिट काम पूर्ण करावे, कामादरम्यान अभियंता उपस्थित असावा, प्रतिबिंबक व सूचना फलक लावावेत आणि कुचराई झाल्यास चडखऊ व कंत्राटदार जबाबदार धरावा, अशा ठोस मागण्या केल्या. यावर सिंग यांनी गणेश आगमनापूर्वी दि. २३ ऑगस्टपर्यंत काम पूर्ण करण्यात येईल अशी हमी दिली. तरीही नागरिकांनी स्पष्ट इशारा दिला की, हा रास्तारोको हा फक्त इशारा आहे. पुढचा मोर्चा आणखी आक्रमक आणि व्यापक असेल. नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत झालेला आहे; प्रशासनाने अजूनही डोळेझाक केली तर रस्त्यावरील संतापाचा ज्वालामुखी फुटेल आणि शासन–कंत्राटदार दोघेही थेट जबाबदार असतील.

# जेष्ठ पत्रकार किरण बाथम यांचे निधन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्यातील मुरुड गावचे सुपुत्र किरण बाथम यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी आकस्मिक निधन झाले. त्यांना अस्वस्थ वाटू लागण्याने कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले असताना आज सोमवारी त्यांची प्राणज्योत मालविली. रायगड जिल्ह्यात पत्रकारितेत त्यांनी आगळा–वेगळा ठसा उमटवीला होता.

त्यांनी धडाडीने आणि निर्भयपणे आपलं पत्रकारितेतील काम केलं. त्यांच्या पश्चात आई, २ मुले आणि २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

---

अर्जदार तर्फे वकील अनंत देवजी पाटील

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्याया.सो. रायगड यांचे कोर्टात

मो.अप.क्लेम.नं.१९६/२०२३

नि.नं.२०/ड

निकीता निलेश मोरे वगैरे ४ — अर्जदार

विरुध्द

रिलायन्स जनरल इन्श्युरन्स कं लि.वगैरे १ — सामनेवाला

प्रति,

सामनेवाला नं. १

१) संदिप शिवाजीराव बढे
सध्या रा. यश परदिसी सीएचएस,
ऐ विंग प्लॉट नं. ३०३ सेक्टर ८ ऐ,
ठाणे नवी मुंबई, महाराष्ट्र – ४००७०८

दिनांक २३/०५/२०२३ रोजी दुपारी ०३:१५ वाजण्याच्या सुमारास मौजे सावरासई गावचे हद्दीत खोपोली पेण रोडावर अपघात घडला. या अपघातामध्ये अर्जदार नं. १ यानी आपल्या पतीचा आणि अर्जदार नं. २ व ३ यानी वडीलांचा व अर्जदार क्र. ४ व ५ यांनी आपला मुलगा निलेश दाजी मोरे हा मयत झाला आहे.

सदर टाटा टेम्पों क्र. एम. एच. ४३ बी. एक्स ३११५ आहे ती सामनेवाला १ च्या मालकीची असून सदर अपघाताचा विचार करता टाटा टेम्पों क्र. एम. एच. ४३ बी. एक्स ३११५ चालकाची पुर्णपणे चुकी आहे म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुध्द अपघात नुकसान भरपाई मिळणेकरीता रू. ३७,९२,२८०/- चा नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे. मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हांस जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दिनांक २६/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला सत्ताही न्यायालयांत सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुध्द पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख १८/०८/२०२५ रोजी माझ्या सहिनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**जिल्हा न्यायालय**
**रायगड–अलिबाग**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**अधिक्षक (न्यायविभाग)**
**जिल्हा न्यायालय**
**रायगड–अलिबाग**

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे–पाटणी पांडापुर, ता–पेण, जि–रायगड, येथील खालील वर्णनाच्या मिळकतींच्या ७/१२ उताऱ्यामध्ये एकूण क्षेत्रास हरिश्चंद्र धर्मा ठाकूर, यांचे नाव नमुद असून, सदरची मिळकत त्यांच्या मालकी हक्काने व ताबे कब्जाची असल्यामुळे सदरहू मिळकत ही आमचे आशिल पवन मधुकर म्हात्रे यांनी विकत घेण्याची ठरविलेली आहे, तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता आमचे आशिलांच्या वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत, सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पाटणी पांडापूर, ता.पेण, जि.रायगड**

| मौजे | गटविभाग/ उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| पाटणी पांडापूर | ७१/२/ब/२ | ००–३१–००<br>पो.ख.००–००–००<br>एकूण क्षेत्र ०–३१–००<br>या मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी ०–१५–५०<br>इतके क्षेत्राकरिता | ४.७८ |

प्राप्त परिस्थीतीत वरील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या सदर मिळकतीमध्ये कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार–मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपला हक्क व हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी, कळवावे, अगर समक्ष येवून भेटावे, वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्जोखमी बोजा विरहित असून, त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही, असे समजण्यात येईल, त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत, असे गृहित धरण्यात येईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पेण
दिनांक : १८/०८/२०२५

**सही/–**
**(रसिक वि. कोठेकर)**
**वकील**
**शशिविश्व बंगलो, म्हाडा वसाहत,**
**प्लॉट नं.८, ता. पेण, जि. रायगड.**
**मोबा. नं. ९५६१९१९१११**

---

अर्जदार तर्फे वकील अनंत देवजी पाटील

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्याया.सो. रायगड यांचे कोर्टात

मो.अप.क्लेम.नं.९८/२०२४

नि.नं.१६/ड

सुपर्णा सुधाकर गुरव वगैरे १ — अर्जदार

विरुद्ध

ICICI लोम्बार्ड जनरल इन्श्युरन्स कं. लि. वगैरे १ — सामनेवाला

प्रति,

सामनेवाला नं. १

१) हरमन लॉजीस्टिक्स एलएलपी
पत्ता– १ मजला, ५ रेनबो को. ओप.
बिल्डिंग, प्लॉट नं.१३, सेक्टर २४,
एच.डी.एफ.सी बँक जवळ, सानपाडा, तुर्भे,
नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र ४००७०५

दिनांक ०२/०४/२०२४ रोजी रात्री ११:१० वाजण्याच्या सुमारास मौजे मुंबई गोवा हायवे रोडवर, कोकण रेल्वे पुलाखाली मुबई, बाजूकडे जाणाऱ्या लेनवर कोलाड च्या हद्दीत झालेल्या अपघातात योगेश सुधाकर गुरव हे गंभीररित्या जखमी होवून मयत झाले आहेत. सदर अपघातामध्ये अर्जदार नं. १ चा मुलगा व अर्जदार नं. २ यांचा पती योगेश सुधाकर गुरव हे मयत झालेल्या आहेत. सदर अपघातामध्ये ट्रेलर क्र. एम.एच. ४३/बी. एक्स ९५१९ वरील चालक याची चुकी होती.

म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुध्द अपघात नुकसान भरपाई मिळणेकरीता रू.६१,२६,६७२/- चा नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे. मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हांस जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दिनांक १७/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयांत सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुध्द पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख १४/०८/२०२५ रोजी माझ्या सहिनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**जिल्हा न्यायालय**
**रायगड–अलिबाग**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**अधिक्षक (न्यायविभाग)**
**जिल्हा न्यायालय**
**रायगड–अलिबाग**

---

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : सांगडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जा, वहिवाटीतील तसेच त्यांचे नांवे सातबारा सदरी नोंद असलेली मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त नोंदणीपूर्वी सदर मिळकतीमधील मूळ मालक यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :–

**– मिळकतीचे वर्णन–**
**मौजे : सांगडे, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड**

| भोगवटादाराचे नांव | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १) लक्ष्मण महादेव पाटील<br>२) बाळकृष्ण महोदव पाटील<br>३) भिमाबाई नागेश पाटील<br>४) बाबीबाई पांडुरंग मते<br>५) सुनंदा महादेव पाटील<br>६) संजय नारायण पाटील<br>७) जिजाबाई नारायण पाटील<br>८) जुईली प्रमोद पाटील<br>९) प्रथमेश प्रमोद पाटील | १२०/४ | ०–०७–१०<br>पो.ख.०–००–२०<br>एकूण क्षेत्र ०–०७–३० | १.३७ |
| | १२०/५ | ०–०३–०० | ०.०६ |

सदरहू जागा, जमिन व सदर मिळकतीसंबंधी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष, तोंडी तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हितसंबंध हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तकारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/०८/२०२५

**सही/–**
**ॲड.शेखर ज. खोपकर**
**९८ पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड–४१०२०६**

---

Adv. Shivaji M. Shingote
Mob.No.9594036714

## PUBLIC NOTICE

IN THE HON'BLE COURT OFCIVIL JUDGE,
(S.D) PANVEL AT PANVEL

CIVIL M. A. NO. 757 OF 2025
Exh No.10/D
N.D. 12/09/2025

1) NITHU SAHA
2) NILIMA SAHA — Applicant

V/S

NILL — Opponent

ALL THE PUBLIC IS INFORMED BY THIS NOTICE THAT:

That late. Mr. Nitai Balahari Saha (hereinafter referred to as deceased no.1) was the brother of Applicants, who expired 16/01/2025, death place: Flat no-204, plot no 85, Parshya heights Co-operative Housing Society Ltd, Sector 17, Near Ramsheth Thakur International Sports Complex, wahal, Panvel, Raigad, Maharashtra, pin code-410206,

That late. Mrs. Nayanmoni Nitai Saha (hereinafter referred to as deceased no.2) who expired 22/07/2024, death place: Flat no-204, plot no 85, Parshva heights Co-operative Housing Society Ltd, Sector 17, Near Ramsheth Thakur International Sports Complex, wahal, Panvel, Raigad, Maharashtra, pin code-410206,

THE DESCRIPTION OF THE IMMOVABLE PROPERTY OF THE DECEASED LATE LATE. MR. NITAI BALAHARI SAHA AND LATE. MRS. NAYANMONI NITAI SAHA LYING IN THE STATE OF MAHARASHTRA.

**SCHEDULE OF PROPERTY 'A'**

| SR. NO. | SR. | SHARES |
|---|---|---|
| 1 | Name of the property Holders: Late. Mr. Nitai Balahari Saha & Late. Mrs. Nayanmoni Nitai Saha, Address of the property: Flat no-204, plot no 85. Parshya Heights Co-operative Housing Society Ltd, Sector-17, Near Ramsheth Thakur International Sports Complex, Wahal, Panvel, Raigad, Maharashtra, pin code - 410206. | 50% 50%, owner of this property |
| 2 | Name of the property Holders: Late. Mr. Nitai Balahari Saha, Address of the property: Flat no-05, 1 Floor, building no 26, Building name-Nisarg Co-operative Housing Society Ltd, survey no. 132, Hissa no. 02, survey no.138, Hissa no.02, survey no.137, Hissa no. 01 & survey no. 139, Hissa no- 07, village-Padaghe, Pale-Budruk, Panvel, Tal- Panvel, Dist.- Raigad, Maharashtra, pin code-410206. | 100% owner of this property |

The Applicants have filed an application before this Hon'ble Court for getting the Heirship Certificate in respect to the above property. The Applicants are the only legal heirs of Late. Mr. Nitai Balahari Saha & Late. Mrs. Nayanmoni Nitai Saha if any person has any objection to these rights. he/she should submit their claim/objection before this Hon'ble Court within 30 days of this Public Notice. If there is no objection raised by any person within stipulated period the Heirship Certificate will be declared in Favor of the Applicants.

I Gave My Sing and Court Stamp.

Dated : / /
Place : Panvel

**Sd/-**
**Clerk**
**Hon.Senior**
**Court Panvel**

**Court Seal**

**Sd/-**
**Asst.Supted.**
**Hon.Senior**
**Court Panvel**

---

मा.हंगरगेकर साहेब
प्रो.जमा रु.५०/–

अर्जदार तर्फे वकिल,
ॲड. शुभांगी केदार लाड

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधीश साहेब, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.११११/२०२५

नि.नं.८/ड

ने.ता.१८/०९/२०२५

कै. रघुनाथ सयाजीराव कदम मयत यांचे वारस
) श्रीमती विनोदिनी रघुनाथ कदम
वय ७१ वर्षे, धंदा गृहिणी
पत्ताः– घर नं. ३०४, कोयनावेळे, पोस्ट ऑफिसजवळ,
पनवेल, कोयनावेळे, रायगड–४१०२०८
२) श्री. रूपेश रघुनाथ कदम
वय ४३, वर्षे, धंदा व्यवसाय
३) श्री. रूणेश रघुनाथ कदम
वय ३८, वर्षे, धंदा नोकरी
पत्ताः– अर्जदार क्र. २ व ३ रा. ०५/१०१,
सुदामा रीजेन्सी, खर्डी पाडा डवले, ओवी हॉस्पिटल
जवळ, दिवा पुर्व, ठाणे, महाराष्ट्र–४००६१२
४) जान्हवी जयदिप शिंदे
पुर्वाश्रमीची रेश्मा रघुनाथ कदम
वय ४१, वर्षे, धंदा गृहिणी
पत्ताः रूम नं. १, गाळा नं. ०२, जय संतोषी माता
सोसायटी, बैतुरकर पाडा, क्वालीटी कंपनीजवळ,
कल्याण पश्चिम, कल्याण–४२१३०१ — अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील कै. रघुनाथ सयाजीवराव कदम यांचा मृत्यू दिनांक १७/०३/२०२३ रोजी घर नं. ३०४, राधीका निवास, कोयनावेळे, पनवेल येथे झालेला असून कै. धनाजी अर्जुन पाटील हे हयात असताना त्यांच्या मृत्यू समयी त्यांचे मालकी हक्कात स्वसंपादीत मौजे– कोयनावेळे, ता. पनवेल, जि. रायगड, मौजे–जुंगटी, ता. पाटण, जि. सातारा, मौजे–पेंधर, ता. पनवेल, जि. रायगड असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**अ) निवासी मिळकतीचे वर्णन**
**मौजे– कोयनावेळे, ता–पनवेल, जि–रायगड येथिल**

| मालकाचे नाव | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे वर्णन | मिळकत बांधकामाचे वर्षे | क्षेत्र चौ.फुट/ चौ.मी. | भांडवली मुल्य (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| रघुनाथ सयाजीराव कदम<br>विनोदिनी रघुनाथ कदम (पत्नी) | ३०४ | मोकळी जागा | २००० | २३०.०१ | ८,२२,५१५/- |

**ब) जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे– कोयनावेळे, ता–पनवेल, जि–रायगड येथिल**

| भोगवटादाराचे नाव | भूमापन क्रमांकाचा उपविभाग | खाते क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| कै.सयाजी बाबुराव कदम | ४१ अ/ ११२ | २४५ | ०.०३.०० | --- |
| | | | एकूण क्षेत्रापैकी कै. रघुनाथ सयाजीराव कदम यांचा अविभाज्य हिस्सा | |
| कै.सयाजी बाबुराव कदम | ४१ अ/ ११३ | २४५ | ०.०३.२० | --- |
| | | | एकूण क्षेत्रापैकी कै. रघुनाथ सयाजीराव कदम यांचा अविभाज्य हिस्सा | |

**क) जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे–जुंगटी, ता–पाटण, जि–सातारा येथिल**

| भोगवटादाराचे नाव | भूमापन क्रमांकाचा उपविभाग | खाते क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| कै.रघुनाथ सयाजी कदम | ७ | २५५ | ०–६४–९२<br>पो.ख.०–०३–९१ | ०.३० |
| | | | एकूण क्षेत्रापैकी कै. रघुनाथ सयाजीराव कदम यांचा अविभाज्य हिस्सा | |

**ड) जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे–पेंधर, ता. पनवेल, जि. रायगड येथील**

| युनिट केस नंबर | सर्व्हे/ हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | पात्रता चौ.मी. | भुधारकाचे नाव | ॲवार्ड प्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| २९१ | २४७/२१ | ०–०६–१२ | --- | कै.सयाजी बाबुराव कदम | ३२१७९.४५ |
| २९१ ए | २५९/१२ /बी | ३–१२–० | | कै.सयाजी बाबुराव कदम | ८६४५२.२५ |

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांना वारस दाखला मिळणे करीता या मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पूरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दिनांक १४/८/२५ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्याने दिली.

**सही/–**
**व.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# फियाट इंडिया लि. कंपनीतील भ्रष्टाचार प्रकरणी नाथाभाऊ शेवाळे यांचा आमरण उपोषणाचा इशारा



**दै.रायगड नगरी । मुंबई**

रांजणगाव औद्योगिक क्षेत्रामध्ये फियाट लि. ही कंपनी गेल्या वीस वर्षांपासून कार्यरत आहे. या कंपनीमधील वरिष्ठ अधिकारी व माथाडी कामगार यांनी शासनाचा जवळपास १००० कोटी रुपयांचा महसूल बुडवला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन योग्य ती कारवाई करण्यात यावी, असे निवेदन जनता दल सेक्युलरचे प्रदेशाध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे यांनी कामगार मंत्री व प्रधानसचिव, कामगार यांना २५ फेब्रुवारी २०२५ रोजी दिले होते. या विषयाची गंभीर दखल घेऊन त्वरित कार्यवाही करण्याचे व शासनास अहवाल सादर करण्याचे आदेश कामगार मंत्री व प्रधानसचिव यांनी माथाडी बोर्ड, पुणे यांना दिले होते.

यावर माथाडी बोर्डाच्या सचिव श्रीमती वाघ यांनी याबाबतचा अहवाल पुणे जिल्हा माथाडी बोर्डाला सादर केला आहे. या अहवालात धक्कादायक गोष्टी उघडकीस आल्या आहेत. संघटनेने बोगस खाते उघडून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करत शासनाचा सुमारे एक हजार कोटींचा महसूल बुडवला आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी व माथाडी कामगारांनी कायद्याची पायमल्ली करत हजारो कोटींचा भ्रष्टाचार केल्याचे निदर्शनास आल्याने, पोलीस यंत्रणेमार्फत याबाबतची चौकशी करण्याचे आदेश पुणे माथाडी बोर्डाच्या अध्यक्षांनी दिले आहेत. याचबरोबर या भ्रष्टाचार प्रकरणात सहभागी असलेल्या कंपनी व्यवस्थापनातील वरिष्ठ अधिकारी व माथाडी कामगारांवर कारवाई करत शासनाचा बुडवलेला महसूल वसूल करावा असा अहवाल त्यांनी शासनास सादर केला आहे.

या प्रकरणामध्ये सहभागी असलेल्या कंपनी अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई करावी यासाठी सदर कंपनीच्या मुंबई येथील टाटा हाऊस, फोर्ट या कार्यालयासमोर दिनांक २५ ऑगस्ट पासून आमरण उपोषण करण्याचा लेखी इशारा नाथाभाऊ शेवाळे यांनी दिला आहे.

### अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेची आपत्कालीन मदत यंत्रणा अलर्ट मोडवर

# सर्व यंत्रणेने सुसज्ज व सतर्क रहावे तर नागरिकांनी काळजी घ्यावी : आयुक्त मंगेश चितळे



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका क्षेत्रात गेल्या दोन दिवसापासून जोरदार पर्जन्यवृष्टी होत असून भारतीय हवामान विभागाने १९ ऑगस्ट रोजी देखील रायगड जिल्ह्याला रेड अलर्ट दिला असून मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. सोमवारी पहाटेपासूनच पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात मुसळधार पाऊसास सुरूवात झाली. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन अलर्ट मोडवर असून पाणी साठणाऱ्या भागावरती अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. तसेच सर्व यंत्रणेला सुसज्ज व सतर्क राहण्याचे आदेश तर नागरिकांनी स्वतःची काळजी घ्यावी असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

जोरदार पडणाऱ्या पावसाच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना चोवीस तास सतर्कता बाळगण्याच्या व परिस्थितीची पहाणी करण्यासाठीच्या सूचना दिल्या आहेत.

दरम्यान पनवेल मधील बांठिया शाळेजवळ मोठ्या प्रमाणात पाणी साठले असून आयुक्त मंगेश चितळे व परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी याठिकाणी प्रत्यक्ष जाऊन पाहाणी केली. याच बरोबर कळंबोलीमध्येही प्रत्यक्ष जाऊन पहाणी केली. तर उपायुक्त रवीकिरण घोडके, प्रभारी अधिक्षक रोशन माळी यांनी प्रभाग क्रमांक १७ पनवेलमध्ये नदी काठची पाहणी केली. कळंबोली मधील २० ठिकाणी २० एचपी पंपाच्या माध्यमातून काढण्यात येत असून याठिकाणी कोठेही पाणी साठणार याची काळजी महापालिकेच्यावतीने घेण्यात येत आहे. तसेच सहायक आयुक्त डॉ.रूपाली माने यांनी एचओसी कॉलनी आदिवासी वाडी येथे भेट दिली.उपायुक्त रवीकिरण घोडके, उपायुक्त अभिषेक पराडकर व सहायक आयुक्त सुबोध ठाणेकर व प्रभाग अधिक्षक दशरथ भंडारी यांच्या देखरेखी-खाली पनवेल शहरातील कोळीवाडा भारत नगर झोपडपट्टी, पटेल मोहल्ला मधील १२५ नागरिकांना कोळीवाडा शाळेमध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहे. तसेच कोळीवाड्यातील १३३ नागरिकांना उर्दु प्राथमिक शाळा येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे. तसेच क्रिडा संकुल येथे ६०लोकांना स्थलांतरित करण्यात आले आहे.

या ठिकाणी चहा ,जेवण, आरोग्य सेवा व पाण्याची सोय पनवेल महानगरपालिका तर्फे करण्यात येणार आहे. तसेच वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने मदत सुरू करण्यात आली आहे. हवामान खात्याने मंगळवारी देखील रायगड जिल्ह्याला अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी महापालिकेच्यावतीने सर्व तयारी करण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदत यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त कैलास गावडे यांनी दिली आहे.

सध्या गाढी नदी इशारा पातळी ६ मी एवढी असून सध्या पाण्याची पातळी ३.७५ मीटर आहे.चारही प्रभागातील प्रभाग अधिकाऱ्यांना त्या त्या विभागातील अद्ययावत माहिती देण्याविषयी आयुक्तांनी सूचित केले आहे. कळंबोली मध्ये भरपूर पाणी साठते, त्यामुळे कळंबोली मधील पाणी उपसा करणारे डिझेल व इलेक्ट्रिक पंप सातत्याने सुरु ठेवण्याच्या सूचना प्रभाग अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच पनवेल मध्ये गाढी नदीच्या पाणी पातळीवर देखील लक्ष ठेऊन याबाबतची माहिती देण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत.

मुसळधार पाऊसात नागरिकांनी धोकादायक इमारतीमध्ये आसरा घेऊनये तसेच झाडे होर्डिंग्ज खाली उभारू नये असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. नागरिकांची सुरक्षितता व काळजी घेण्यासाठी महापालिका तत्पर असून कोणत्याही परिस्थितीत नागरिकांनी घाबरून जाऊ नये असे आ-वाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. महापालिकेच्या सर्व विभागांनी आयुक्तांच्या निर्देशानुसार आपापसात योग्य समन्वय ठेवून अलर्ट मोड' वर काम करावे, योग्य नियोजन करून उपाययोजना कराव्यात, अशा सूचना अतिरिक्त आयुक्त व उपायुक्तांनी महापालिकेच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# अशोक गायकर यांचे सहा वर्षासाठी निलंबन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पक्षाच्या विरोधात वर्तन करत असल्याबद्दल भिंगार ग्रामपंचायतीचे उपसरपंच व भाजप कार्यकर्ते अशोक राजाराम गायकर यांचे भारतीय जनता पार्टीतून सहा वर्षांकरिता निलंबन करण्यात आले आहे.

अशोक गायकर हे पक्षाच्या विरो-धात सातत्याने भूमिका घेऊन आपल्या वर्तनातून पक्षाची प्रतिमा मलिन करण्याचे काम करीत असल्याच्या तक्रारी वारंवार पक्षाकडे येत आहेत, त्या अनुषंगाने या संदर्भात वारंवार समज देऊन सुद्धा ते पक्षाविरोधात कार्यवाही करत आहेत.

पक्षाच्या विरोधात करण्यात येत असलेल्या वर्तनामुळे उत्तर रायगड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या शिफारशीनुसार अशोक गायकर यांचे सहा वर्षांकरिता निलंबन करण्यात आले असून त्या संदर्भातील पत्र भाजपचे पनवेल पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील यांनी अशोक गायकर यांना पाठवले आहे.

# हेटवणे धरणाचे सहा दरवाजे उघडले

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील हेटवणे मध्यम प्रकल्प, कामार्ली येथे धरण सुरक्षित असून सोमवार (१८ ऑगस्ट २०२५) रोजी सकाळी ११.२८ वा. धरणाचे सहा उभे दरवाजे प्रत्येकी २० सें.मी. उघडण्यात आले आहेत. सध्या धरणाची पाण्याची पातळी ८५.१० मीटर असून सांडव्यातून २० सें.मी. खोलीने पाणी वाहत आहे. या अनुषंगाने ११९.५४ घनमीटर प्रति सेकंद इतका विसर्ग सुरू आहे. त्यामुळे भोगेश्वरी नदीकाठच्या सर्व नागरिकांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे.



धरणाची संकल्पित संचय पातळी ८३.१० मीटर असून संपूर्ण जलाशय पा-तळी ८६.१० मीटर आहे. सध्या धरणा-तील एकूण साठा १४१.५८७ दलघमी असून उपयुक्त साठा १३९.०७७ दलघमी आहे, जो ९६ टक्के इतका आहे. आज परिसरात ६९ मिमी पाऊस नोंदवला गेला असून आतापर्यंतचा एकूण पाऊस २३४५ मिमी इतका झाला आहे. पाणलोट क्षेत्रात पुढील पावसाची तीव्रता आणि हवामानाचा अंदाज यावर आधारित विसर्गाचे प्रमाण बदलू शकते, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

धरण सुरक्षित असून नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. मात्र, नदीकाठच्या गावांतील लोकांनी सावधान-ता बाळगावी, नदीकाठावर न जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अद्यावत पूरस्थितीबाबत वेळोवेळी प्रशासनाकडून माहिती देण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे


## पनवेल महानगरपालिका

**पशुवैद्यकीय विभाग**

कार्यालय : देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल-४१०२०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९
ई-मेल: panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र.पमपा/पशुवैद्यकीय सेवा/८८१/२०२५-२६ दिनांक : १८/०८/२०२५

### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिकेतील एरोड्रांम क्षेत्राच्या अनुषंगाने पक्षी व प्राण्यांचा धोका टाळण्याकरिता सल्लागार नेमणूक करणेकामी. इच्छुकांनी सदरचे निविदा दर दि. २८/०८/२०२५ रोजी सायं ४.०० वाजेपर्यत महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे समक्ष सादर करावीत. सदर दिनांका नंतर प्राप्त झालेले दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.

| अ.क्र. | तपशिल | ठेकेदाराचे द्यावयाचे दर (GST वगळता) |
|---|---|---|
| १ | Bird Strike Hazards and its Mitigation Measure required in Aerodrome Area Under Panvel Muncipal Corporation Jurisdiction.<br>I. What are the factors attracting birds to the airfields.<br>II. Which are the bird species involved inconflicts with aircrafts?<br>III. What are the for options available habitat/ ecosystem management to prevent the birds from air fields?<br>IV. General bird species composition at project site<br>V. Local bird And Migratory Bird movement patterns between Aerodrom Areas and Runway areas.<br>VI. Identification of important roosting and nesting sites within Aerodrome Area under Pme.<br>VII. Clearly Identify Factors in Aerodrome Areas leading to related avintion risk.<br>VIII. Suggesting mitigation Measures<br>IX. Quarterly Report (Bird Strike hazard risk & mitigation method) | |

या कामी अटी व शर्ती खालील प्रमाणे:-
१. संस्था नोंदणी प्रमाणपत्र.
२. पॅनकार्ड (संस्थेचे नावाने अथवा मालकाचं नावाचे)
३. नमुद केलेले दर हे सर्व प्रकारचे वाहतुक खर्चासह समाविष्ठ असावेत.
४. सदरची जाहीर सूचना फक्त दर खात्री करणे करीता मागविणेत येत आहे.
५. या कामी काही माहीती हवी असलेस पशुवैद्यकीय विभागाकडे संपर्क साधावा.
६. या कामी दरांची खात्री झालेनंतर जाहीर ई-निविदा मागविणेत येईल.
७. प्राप्त जाहीर निविदा सूचना दर स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार निविदा समितीला असतील.

**सही/-**
**मा.उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**


# श्रीमती इंदूबाई वाजेकर स्कूलमध्ये पार पडली गणेशमूर्ती कार्यशाळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेच्यवतीने दरवर्षीप्रमाणे 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत 'उत्सव गणपतीचा, जागर पर्यावरणाचा' ही संकल्पना पर्यावरणपूरक गणोत्सव साजरा केला जात आहे. या अंतर्गत नुकतेच पनवेलमधील श्रीमती इंदूबाई वाजेकर स्कूलमध्ये गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा पर्यावरण दक्षता मंच यांच्या माध्यमातून उत्साहात पार पडली.

या कार्यशाळेत शाळेतील विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून मूर्ती बनविण्याबरोबरच कलात्मक पद्धतीने रंगकाम करण्याचे प्रशिक्षण दिले गेले. उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनूसार पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्व मुलांना बालपणापासून पटवून देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

या प्रसंगी पर्यावरण विभागप्रमुख मनोज चव्हाण, शाळेचे अध्यक्ष व्ही.सी. म्हात्रे सर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. मनिषा पाटील, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मानसी कोकिळ, तसेच भारत विकास परिषदेचे तनय दिक्षीत, स्मित राऊत, वदांग कुंभार, सी. पद्मजा कुलकर्णी आणि पर्यावरण दक्षता मंचाचे कार्यकर्ते प्रल्हाद बोडके उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक उत्सव याबाबत मार्गदर्शन केले आणि कार्यशाळेतील विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक केले.

ब्राह्मण समाज खारघर आणि रोटरी क्लब ऑफ मिडटाउन खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने 'माझा गणपती माझ्या हस्ते' या उपक्रमांतर्गत शाडू मातीपासून गणेश मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा उत्साहात पार पडली. खारघरमधील स्थानिक नागरिक, लहान मूले तसेच महिलांनी या कार्यशाळेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. गणेश मूर्ती बनविण्याच्या कार्यशाळेत मुलांनी आपल्या कल्पकतेने विविध आकारांच्या आणि आकर्षक मुर्ती तयार केल्या.

या प्रसंगी खारघर ब्राह्मण समाजाच्या अध्यक्षा प्राजक्ता दिवेकर, उपाध्यक्ष वर्षा मराठे, कोषाध्यक्ष अनघा सहस्त्रबुध्दे ,वंदना रंजोलकर आणि रोटरी क्लब ऑफ मिडटाउन खारघरचे सदस्य उपस्थित होते. त्यांनी सहभागीना प्रोत्साहन देत पुढील काळात अशा उपक्रमांमधून पर्यावरणपूरक उत्सव संस्कृती जोपासण्याचे आवाहन केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी समाजातील कार्यकर्ते, रोटरी क्लबचे स्वयंसेवक आणि स्थानिक नागरिकांचे सहकार्य लाभले, उपक्रमाबद्दल नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने आयोजकांनी समाधान व्यक्त केले आणि दरवर्षी अशा उपक्रमांचे आयोजन करून हरित व प्रदूषणमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचा संकल्प केला.



# जोरदार पावसामुळे राजपुरी रस्त्यावर मोठा दगड

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेल्या चार दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे मुरुड तालुक्यातील मुरुड ते राजपुरी रस्त्यावर डोंगरी ते राजपुरी दरम्यान डोंगरावरून भला मोठा दगड रस्त्यावर पडला, सुदैवाने जिवित व वित्तहानी झाली नाही.

या रस्त्यावर यापूर्वी देखील डोंगरावरुन रस्त्यावर दगड पडण्याच्या घटना घडल्या आहेत.जंजिरा किल्ला पाहण्यासाठी या रस्त्यावर पर्यटकांची वर्दळ असते.नुकत्याच स्वातंत्र्यदिन, गोकुळाष्टमी, शुक्रवार शनिवार रविवार तीन दिवस रस्त्यावर ये जा करणा-यांची रेलचेल होती.

पावसाळा असल्याने काही हौशी पर्यटक या ठिकाणाहून जंजिरा किल्ला न्याहाळत आनंद घेत असतात.वेळप्रसंगी या डोंगरावरुन दगड रस्त्यावर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

राजपुरी रस्त्यावर मोठा दगड पडला असल्याचे समजताच सार्वजनिक बांधकाम खात्याचे सिव्हिल इंजिनिअर असिस्टंट रोशन पाटील यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन जेसीबी च्या साहाय्याने दगड हटविण्यात येऊन वाहतूक पुर्ववत करण्यात आली आहे.